॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२५–२६/६२ दिनांक : ०१/०७/२०२५

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी,
नांदेड जिल्हातील रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: नांदेड जिल्हा कॉफी टेबलबुक २०२५– हौशी फोटोग्राफर्स साठी CoffieTable book-NANDED छायाचित्र स्पर्धेत सहभागी होणे बाबत.**

संदर्भ: मा. महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांचे जा.क्र. २०२५–कॉटेबु–टे–६–फो.ग्रा.स्प/सिआर, दिनांक ०१/०६/२०२५

महोदय,

उपरोक्त विषयी मा. महेश वडदकर, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांनी संदर्भिय पत्रान्वये नांदेड जिल्हा कॉफी टेबलबुक २०२५ या संकलनासाठी हौशी फोटोग्राफरसाठी **CoffieTable book-NANDED** छायाचित्र स्पर्धा, हौशी छायाचित्रकारांसाठी आयोजित केली आहे. त्यानुषंगाने आपल्या विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयातील आभियांत्रिकी विद्यार्थ्यांना फोटोग्राफी प्रशिक्षण दिल्या जात असल्याचे समजले आहे. या विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणात्मक वाढीसाठी आवश्यक असा मंच या स्पर्धेच्या रूपाने परत एकदा उपलब्ध करून देतांना जिल्हा प्रशासनास आनंद होत आहे व सर्व प्रशिक्षण घेत असलेल्या व इतरही विद्यार्थ्यांना सदरील छायाचित्र स्पर्धा संकल्पना निदर्शनास आणून द्यावी व या स्पर्धेत संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरघोस सहभाग नोंदवावा असे कळविले आहे

तरी त्या अनुषंगाने नांदेड जिल्हयातील रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात जे हौशी छायाचित्रण करणारे विद्यार्थी आहेत अशा विद्यार्थ्यांना मा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्या मार्फत आयोजित करण्यात येत असलेल्या जिल्हा कॉफी टेबलबुक २०२५ हौशी फोटोग्राफरसाठी **CoffieTable book-NANDED** छायाचित्र स्पर्धेत सोबत जोडण्यात आलेल्या प्रपत्रात दर्शविण्यात आलेल्या सुचनांचे अवलोकन करून जास्तीत जास्त संख्येने सदरील स्पर्धेत सहभाग नोंदवावा, ही विनंती.

डॉ. मल्लिकार्जुन करजगी
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:

१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

| जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट- https://nanded.gov.in/ | ई-मेल –dmbackoffice@gmali.com |
| दुरध्वनी क्रमांक-02462-245946 | फॅक्सः 02462-245946 |
| शाखाः- दंडाधिकारी | क्र.2025-कॉटेबु-टे-6-फो.ग्रा.स्प/सिआर |

दिनांकः-, /05/2025

**प्रेसनोट**

**नांदेड जिल्हा कॉफी टेबलबुक २०२५ - हौशी फोटोग्राफर्स साठी**

**Coffi Table book-NANDED छायाचित्र स्पर्धा**

नांदेड जिल्ह्यातील संस्कृतीचे आदान प्रदान, स्थानिक कलाकारांसाठी व्यासपीठ, लुप्त होत चाललेल्या कला व संस्कृतीचे जतन व संवर्धन, तसेच मराठवाडा मुक्तीसंग्रामातील अज्ञात लढवाय्यांची माहिती इत्यादी बाबी जनसामांन्यापर्यंत पोहोचविण्यासाठी, नांदेड जिल्ह्यातील माहिती संवर्धनाचे कार्य जिल्हाप्रशासनाकडून अविरत चालू आहे. या संकलनामधील सतत नव्याने नमुद करावयाच्या घटनांचे छायाचित्रीकरणासह माहिती जमा करण्याचे कार्य देखील UPDATE NANDED या अंतर्गत करने जिल्हाप्रशासनाचे कर्तव्य आहे.

नांदेड जिल्ह्यातील विविध जैवविविधता, पर्यटनस्थळ, पशु-पक्षी, वनसंपदा, धबधबे, नदी, शिल्प, ऐतिहासिक स्थळे आदी विषयांना प्रतिबिंबीत करणारे, नव्याने तयार झालेली पर्यटन स्थळ, नव्या तंत्राव्दारे काढलेली छायाचित्रे यांची एक स्पर्धा या निमित्ताने आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धा कालावधीत प्राप्त गुणवत्ता, विविधता संपन्न छायेचित्र समितीद्वारे अंतिम करण्यात येतील, समितीने निवड केलेल्या निवडक छायाचित्रांचा समावेश प्रशासना मार्फत नियोजीत कॉफीटेबल बुक मध्ये करण्यात येईल. निवड झालेल्या १०० छायाचित्रांना गौरविण्यात येईल.

छायाचित्र स्पर्धेत समाविष्ट होणाऱ्या छायाचित्रां करिता पुढील विषय देण्यात येत आहेत.

१) निसर्ग २) पशु-पक्षी ३)शिक्षण ४)कला ५) जुनी नवी स्थापत्य ६)जीवनशैली ७) खेळ ८) पर्यटन ९) खाद्य संस्कृती १0) जैव विविधता ११) परंपरा १२) संस्कृती १३) नांदेड जिल्ह्यातील नवीन पर्यटन स्थळे १४) माहिती नसलेली स्थळे

वरील विषयात दिनांक 01 जानेवारी 2025 ते फोटोस्पर्धा सामिल होण्याच्या दि. 15 जुलै 2025 रोजी मध्य रात्री पर्यंत काढलेली छायाचित्र खालील अटीशर्तीत बसणारीच ग्राह्य धरल्या जातील. फोटो स्पर्धेत निकाल अंतीम करण्याचे / नाकारण्याचे सर्व हक्क आयोजन समितीचे राहतील. **स्पर्धेचा विहित नमुन्यातील अर्ज नांदेड जिल्हाचे (https://nanded.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.**

या स्पर्धेत मोठ्या प्रमाणात हौशी छायाचित्रकारांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी केले आहे.

| जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट- https://nanded.gov.in/ | ई-मेल –dmbackoffice@gmali.com |
| दुरध्वनी क्रमांक-02462-245946 | फॅक्सः 02462-245946 |
| शाखाः- दंडाधिकारी | क्र.2025-कॉटेबु-टे-6-फो.ग्रा.स्प/सिआर |

## नांदेड जिल्हा कॉफी टेबलबुक २०२५ - हौशी फोटोग्राफर्स साठी Coffi Table book-NANDED छायाचित्र स्पर्धा -नियम अटी व शर्ती

१) नांदेड जिल्ह्या भौगोलीक क्षेत्र मर्यादापुरती छायाचित्र स्पर्धेसाठी छायाचित्र खालील ईमेल आयडी वर पाठविण्यात यावीत.

२) प्रत्येक छाया चित्रासोबत , दोन ते तीन वाक्यात माहिती मराठी भाषेत, युनिकोड फॉन्ट वर किंवा हस्तलिखीत करुन त्याचा स्पष्ट फोटो स्वरुपात करुन पाठवावी.

३) एका छायाचित्रकाराला स्पर्धेत घोषीत विषयासाठी **एकुण १०** छायाचित्र सहभागी करता येतील.

४) स्पर्धेत आयोजकांमार्फत मुळ थीमशी जुळणारी त्यांची मूळ डिजिटल छायाचित्रे मागणी केली गेल्यास, स्पर्धकांस ती सादर करावी लागतील.

५) स्पर्धेत जानेवारी २०२३ ते फोटोस्पर्धा सामिल होण्याच्या अंतीम तारखे पर्यंत काढलेली छायाचित्रच ग्राह्य धरल्या जातील.

६) फोटो /छायाचित्रे उक्त अर्जासह **(अर्ज PDF स्वरुपता २एमबी मर्यादीत)** खालील ईमेल आयडी वरच सादर केलेली ग्राह्य धरली जातील. ब्लर झालेली छायाचित्रे ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

७) DSLR आणि Mobil फोटोग्राफी या दोन्ही फॉर्ममध्ये स्पर्धक भाग घेऊ शकतात. मान्यता प्राप्त ठिकाणाची व नोंदणीकृत ड्रोन प्रणाली व्दारे काढलेली छायाचित्रेच स्पर्धेसाठी स्विकारली जातील, याची सहभागी हौशी, प्रोफेशनल फोटो ग्राफर्सने नोंद घ्यावी.

८) फोटो उच्च-रिझोल्यूशन JPEG किंवा PNG फाइल्स असने आवश्यक आहे.

९) फोटोवर कोणत्या प्रकारचा लोगो, वॉटर मार्क, कॉपीराईट मार्क,ओळखीचे चिन्ह, अथवा कोणतीही अन्य दृष्य स्वरुपाची बाब टाकता येणार नाही.

१०) फोटो त्याच्या मूळ स्थितीत असणे आवश्यक आहे. रंग, कॉन्ट्रास्ट, ब्राइटनेस ऍडजस्टमेंट आणि फोटो(चे) क्रॉप करणे यासह मूलभूत संपादन स्वीकार्य आहे, परंतु असे कोणतेही संपादन फोटोच्या सत्यतेवर आणि/किंवा वास्तविकतेवर परिणाम करत नाही.

११) विजेता स्पर्धकाकडील छायाचीत्राच्या मुळ फाईल्स RAW / Jpeg मागणी केल्यानंतर सादर करने संबंधीत स्पर्धकास बंधनकारक राहील.

१२) स्पर्धा सर्व वयोगटातील सर्व फोटोग्राफी प्रेमींसाठी खुली आहे.

१३) जिल्हा प्रशासन नांदेड यांना स्पर्धा आणि त्याच्या थिमशी सादर केलेली छायाचित्रे भविष्यात संबंधित प्रचारात्मक हेतूंसाठी वापरण्याचा आणि प्रदर्शित करण्याचा अधिकार असेल. त्याबाबत भविष्यात कुठलीही आर्थिक अथवा मानधन स्वरुपाची मागणी, स्पर्धकास करता येणार नाही.

१४) छायाचित्रकार आणि कलाकारांचे तज्ञ पॅनेल सर्जनशीलता, तांत्रिक गुणवत्ता, रचना आणि थिमसह सरेखन यावर आधारित निवड करेल.

१५) निवड झालेल्या विजेत्यांना थेट जिल्हा प्रशासनाकडून निवडी बाबत कळविले जाईल.

१६) सर्व विषयतून प्रत्येकी एक किंवा अधिक विजेत्यांना जिल्हा प्रशासनाकडून गौरविण्यात येईल.

१७) स्पर्धा सर्व वयोगटासाठी खुली आहे.

१८) अयोग्य वाटली जाणारी किंवा नमूद केलेल्या स्पर्धेच्या नियमांचे पालन न करणाऱ्या कोणत्याही प्रवेशास अपात्र ठरवण्याचा अधिकार आयोजकांनी राखून ठेवला आहे.

१९) स्पर्धक वय वर्षे १८ खालील असल्यास वरील अर्जावर पालकांची स्वाक्षरी त्यांचा आधार कार्ड नंबर सह नोंदविणे क्रमप्राप्त आहे.

२०) छायाचित्राचा मुळ हक्क हा छायाचित्र स्पर्धकाचा असून, संबंधीत छायाचित्र इतरत्र वापरण्याची मुभा छायाचित्रकारास असेल.

**२१) छायाचित्रे पाठविण्याची अंतिम मुदतः 15/07/2025 असेल.**

२२) परिक्षेच्या निकालाबाबत सर्व अधिकार निवड समिती व जिल्हा प्रशासनाकडे राखीव राहतील.

२३) सर्व सहभागी छायाचित्र स्पर्धकांना सहभागाचे ई-प्रमाणपत्र प्राप्त होईल.

**छायाचित्रे पाठविण्यासाठी ईमेल आयडी –**

**संपर्कासाठी भ्रमणध्वणी क्रमांक – 7972370439 (श्री सोपान गुंडाळे, वरिष्ठ लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड)**

मला उक्त सर्व नियम,अटी मान्य आहेत. त्याबद्दल मी खालील स्वाक्षरी करीत आहे.

**स्पर्धकाची स्वाक्षरी**

**(स्पर्धक वय वर्षे** १८ खालील असल्यास वरील **अर्जावर पालकांची स्वाक्षरी त्यांचा आधार कार्ड नंबर )**

नाव :- -------------------------------------------

पत्ता :- -------------------------------------------